रे.दि.मु.नं. २५/२०१७ मधील नि.क्र.४९ खालील आदेश

**<u>(गणेश राजेंद्र मालुसरे वि. हौसाबाई लक्ष्मण मालुसरे वगैरे)</u>**

**CNR No.- MHST16-000086-2017**

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांचे विरुद्ध नि.१ खाली दावा एकतर्फा चालविण्याचा झालेला आदेश रद्द होवून मिळणेबाबत केला आहे.

२. प्रतिवादी क्र.३ चे असे म्हणणे आहे की वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुद्ध वाटप होवून मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.३ यांना नि.१९ प्रमाणे दाव्याचे समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी ही समन्सची बजावणी होवुन देखील हजर न झाल्याने तिच्या विरुद्ध एकतर्फा आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र.३ हिला कायदेशीर बाबींचे ज्ञान नाही. प्रतिवादीला तिच्या संसारातील अडचणींमुळे, आजारपणामुळे न्यायालयात हजर राहून शकलेली नाही. दाव्याचे अंतिम निर्णय गुणदोषांवर होण्याकरिता तसेच न्यायाचे दृष्टीने प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.३ यांचे विरुद्ध झालेला नि.१ वरील एकतर्फा आदेश रद्द होवून तसेच कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जास म्हणणे दाखल न केल्याने सदरचा अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

४. वादीचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की वादी हिस नि.१९ प्रमाणे दिनांक १२.०६.२०१७ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी करण्यात आलेली आहे. परंतु ते हजर न झाल्याने १२.०७.२०१७ रोजी नि.१ वर त्यांच्या विरुद्ध एकतर्फा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर देखील प्रतिवादी हे हजर झाले नाहीत व दिनांक २२.०२.२०२३ रोजी प्रतिवादी हे त्यांचे विधिज्ञांमार्फत हजर झाले व सदरचा अर्ज दाखल केला आहे. म्हणजेच प्रतिवादी हे साडेपाच वर्षाच्या दिर्घ कालावधीनंतर हजर होवून अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे निष्काळजीपणामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडलेले आहे. प्रतिवादी यांना न्यायाचे दृष्टीने संधी देणे आवश्यक असलेतरी, प्रतिवादी यांना झालेला विलंब हा

दीर्घ कालावधीचा आहे. दावा ६ वर्षापेक्षा जुना आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता, तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३ हिचेवर खर्च लादुन मंजुर करणे योग्य होईल. करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१.** अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी क्र.३ हिच्या विरुद्ध दिनांक १२.०७.२०१७ रोजी नि.१ खाली झालेला एकतर्फा आदेश तिच्यावर खर्च रक्कम रुपये २,०००/– (रक्कम रुपये दोन हजार) लादुन रद्द करण्यात येतो.

**३.** खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.३ हिने वादीला दयावी.

CHHAYA VIKRAM SHIRSAT

Digitally signed by CHHAYA VIKRAM SHIRSAT
Date: 2023.10.27 15:45:39 +0530

ठिकाण – वाई. (सी. व्ही. शिरसाट)

दिनांक – २५.१०.२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.